## प्रकरणाचा तपशील

**सतीश पी. भट्ट**

**विरूध्द**

**महाराष्ट्र राज्य आणि ईतर**

(फौजदारी अपील क्रमांक 42 ऑफ 2024)

03 जानेवारी 2024

**[विक्रम नाथ* आणि राजेश बिंदल, न्यायमुर्ती ]**

## विचारकरण्याजोगा मुद्दा

अपीलकर्त्याने आपल्या आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात सातत्याने अपयशी ठरल्याने त्याचा जामीन आणि शिक्षा स्थगित करण्याचे आदेश रद्द झाले, त्याच्या विरोधात उच्च न्यायालयाने ठाम भूमिका घेतली. उच्च न्यायालय योग्य होते का?

## हेडनोट्स

**न्यायालयीन निर्देश - अवहेलना - उच्च न्यायालयाने अपीलकर्ता आणि मध्यस्थ (उच्च न्यायालयासमोरील याचिकाकर्ते) यांना दिलेली शिक्षा आणि जामीन स्थगित करण्याचा आदेश रद्द केला कारण त्यांनी उच्च न्यायालयासमोर दिलेल्या प्रतिज्ञापत्राचे उल्लंघन केले आणि पालन करण्यासाठी मुदतवाढ देण्याच्या आदेशात अटींचे उल्लंघन केले - औचित्य:**

**न्यायलयाने धरलेः** उच्च न्यायालयासमोर अपीलकर्ता व मध्यस्थ यांनी 03.07.2018 रोजीच्या तडजोडीच्या आधारे प्रतिज्ञापत्र दाखल केले ज्यानुसार एकूण रु.4,63,50,000/-

(या रकमेपैकी रु.73,50,000/- आधीच भरले गेले होते व उर्वरित रक्कम रु.3,90,00,000/- हप्त्यात भरायची होती) तक्रारदार-उत्तरदाता क्र.2 यांना देण्यात येईल - या प्रतिज्ञापत्राच्या आधारे तुरुंगवास भोगण्याच्या बाबतीत अंतरिम संरक्षण देण्यात आले आणि तुरुंगवास भोगून त्यांना वैयक्तिक मुचलके भरून जामिनावर सोडण्याचे निर्देश देण्यात आले - तथापि, आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात अपयश आले - अपीलकर्ता आणि मध्यस्थांनी सर्वोच्च न्यायालयासमोर बाजू मांडली की, कोणाला किती रक्कम द्यायची आहे - न्यायालय या प्रश्नात जाण्यास तयार नाही - वस्तुस्थिती अशी आहे की देण्यास मान्य केलेली एकूण रक्कम भरली गेली नाही आणि उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रीव्हीजनीस्ट (अपीलकर्ते आणि मध्यस्थ) सहमत रक्कम भरण्यात चुकले, जामीन आणि शिक्षेच्या स्थगितीद्वारे दिलेले अंतरिम संरक्षण न्यायालयाच्या संदर्भाशिवाय मागे घेतले जाईल - उच्च न्यायालयाच्या आदेशात कोणतीही कमतरता नाही - त्यानुसार अपील फेटाळले जाते

उत्तरदाता क्रं. 2 ला (फिर्यादी) 5 लाख रुपये खर्च द्यावा लागेल.

[परिच्छेद 7, 8, 17, 19]

**की वर्ड ची यादी**

न्यायालयीन निर्देशांकडे दुर्लक्ष; न्यायालयीन कार्यक्षमतेवर घाला घालणे.

**संबंधित आदेश आणि उपस्थितीसह इतर प्रकरणाचा तपशील**

फौजदारी अपीलय अधिकार क्षेत्र : 2024 चे फौजदारी अपील क्रमांक 42.

मुंबई उच्च न्यायालयाच्या 2019 च्या सीआरएलएपी क्रमांक 244 मधील दिनांक 23.07.2019 च्या निर्णय व आदेशातून.

**उपस्थीती :**

अतुल बाबासाहेब दाख, दिगंत गोगोई, बिटू कुमार सिंग, अपीलकर्त्यातर्फे अ‍ॅड. आदित्य अनिरुद्ध पांडेय, सिद्धार्थ धर्माधिकारी, भरत बागला, सौरव सिंह, आदित्य कृष्णा, सिद्धार्थ संगल, मिस ऋचा मिश्रा, चिराग शर्मा, मिस नीलंजनी टंडन, मिस हर्षिता अग्रवाल, मनोज के मिश्रा, घनश्याम उपाध्याय, ए. भास्कर, जेके मिश्रा, उमेश दुबे, विशाल, मिस मधुलिका, वकील उत्तरदात्यांसाठी.

**सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय / आदेश**

**निर्णय :**

**विक्रम नाथ, न्यायमुर्ती.**

1. न्यायालयीन निर्देशांकडे सातत्याने दुर्लक्ष आणि कायदेशीर व आर्थिक जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष करणारी परिस्थिती या प्रकरणातील वस्तुस्थितीतून समोर येते. आर्थिक जबाबदाऱ्या आणि न्यायालयाच्या आदेशांबद्दल एखाद्या व्यक्तीचा निष्काळजी दृष्टिकोन न्यायालयीन कार्यक्षमतेचे मर्म कसे कमकुवत करू शकतो याचा पुरावा म्हणून याचिकाकर्त्याचे वर्तन उभे करते.

2. उच्च न्यायालयाने अपीलकर्त्याच्या आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात सातत्याने अपयशी ठरल्याबद्दल कठोर भूमिका घेतली, परिणामी त्याचा जामीन रद्द झाला आणि शिक्षा स्थगिती रद्द झाली. वारंवार पालन न केल्याने कायदेशीर व्यवस्थेची निराशा दर्शविणारा हा निर्णय आमच्या चर्चेचा मार्ग मोकळा करतो.

3. परवानगी मंजूर.

4. सध्याच्या अपीलात मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक 23.07.2019 रोजी दिलेला निर्णय व आदेशाची सत्यता अधोरेखित केली आहे कारण त्यांनी 03.07.2018 रोजी उच्च न्यायालयासमोर दिलेल्या प्रतिज्ञापत्राचे उल्लंघन केले आणि समतारखेच्या आदेशात नोंद केली आणि त्यात समाविष्ट अटींचे उल्लंघन केले म्हणून अपीलकर्ते तसेच मध्यस्थ (उच्च न्यायालयासमोरील याचिकाकर्ते) यांना 03.07.2018 च्या आदेशाद्वारे दिलेली शिक्षा आणि जामीन स्थगित करण्याचा आदेश रद्द केला कारण दिनांक 20.03.2019 च्या आदेशाच्या परिच्छेद 3 मध्ये पालन करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली होती, त्याचे उल्लंघन केले.

5. याचिकाकर्ते-सतीश पी. भट्ट आणि मध्यस्थ विश्वनाथ रामकृष्ण नायक मेसर्स अॅस्ट्रल ग्लास प्रायव्हेट लिमिटेड (थोडक्यात एजीपीएल) नावाच्या कंपनीचे अध्यक्ष-सह-व्यवस्थापकीय संचालक आणि उपाध्यक्ष होते. एजीपीएल कंपनी, तसेच अपीलकर्ता आणि मध्यस्थ यांना निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स अॅक्ट, 1881 च्या कलम 138 अन्वये[1] कनिष्ठ न्यायालयाच्या 26.08.2011 च्या निकाल आणि आदेशानुसार तीन वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये दोषी ठरवण्यात आले आणि तिन्ही प्रकरणांमध्ये एकूण 5 कोटी रुपयांच्या दायित्वासह दहा महिन्यांची शिक्षा ठोठावण्यात आली. एका प्रकरणात कनिष्ठ न्यायालयाने नोंदवलेल्या दोषसिद्धी आणि शिक्षेचा ऑपरेटिव्ह भाग खालीलप्रमाणे पुनरुत्पादित केला आहे:

"I) आरोपी क्रमांक 2 श्री सतीश पद्मनाथ भट (वय 54 वर्षे) व आरोपी क्रमांक 3 श्री विश्वनाथ रामकृष्ण नायक वय 50 वर्षे, दोघेही रा. बोरिवली (पूर्व), मुंबई-400066) यांना निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स अॅक्टच्या कलम 138 अन्वये गुन्ह्यासाठी सीआरपीसी कलम 255 (2) अन्वये दोषी ठरवून प्रत्येकी 10 (दहा) महिन्यांची साधी कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

1 एनआय अधिनियम

II) दोन्ही आरोपींनी सीआरपीसी कलम 357 (3) अन्वये तरतुदीनुसार तक्रारदाराला नुकसान भरपाई म्हणून एकूण 1,10,00,000/- रुपये (फक्त एक कोटी दहा लाख रुपये) 3 महिन्यांच्या आत द्यावेत. टाळाटाळ केलयास पुढील शिक्षा प्रत्येकी 6 (सहा) महिन्यांची साधी कैद भोगायची आहे.

III) अपीलकालावधी संपेपर्यंत आणि आरोपी क्रमांक 3 चे पी.आर.बॉण्ड रद्द होईपर्यंत आरोपी क्रमांक 2 ची रु.3000/- ची रोख सुरक्षा कायम राहील...."

6. अपीलकर्ते, मध्यस्थ आणि एजीपीएल यांनी संयुक्तपणे दाखल केलेले तीन अपील सत्र न्यायालयाने 30.01.2014 च्या सामायिक निर्णय आणि आदेशाद्वारे फेटाळले. शिक्षा भोगण्यासाठी सत्र न्यायालयाने आत्मसमर्पण करण्यासाठी एक महिन्याची मुदत दिली.

7. त्यामुळे नाराज झालेल्या त्यांनी मुळात तीन तक्रारी असल्याने उच्च न्यायालयात तीन सुधारणांना (रिव्हीजन) प्राधान्य दिले. उच्च न्यायालयासमोर अपीलकर्ता व मध्यस्थ यांनी 03.07.2018 रोजीच्या तडजोडीच्या आधारे प्रतिज्ञापत्र दाखल केले ज्यानुसार तक्रारदार उत्तरदाता क्र. 2 ला एकूण रु.4,63,50,000/- इतकी रक्कम देण्याचे मान्य करण्यात आले. या रकमेपैकी रु.73,50,000/- अपील न्यायालयात यापूर्वीच देण्यात आले होते. त्यानुसार उर्वरित रु.3,90,00,000/- हप्त्यांमध्ये भरणे अपेक्षित होते. देयकाचे वेळापत्रकही परिच्छेद 6 आणि 7 मध्ये निश्चित करण्यात आले होते तर परिच्छेद 5 मध्ये सेटलमेंटच्या रकमेचा उल्लेख करण्यात आला होता. तडजोडीच्या परिच्छेद 8 मध्ये नमूद केले आहे की ही रक्कम अपीलकर्ता आणि मध्यस्थ समानपणे देतील. तथापि, दोघांपैकी कोणीही सेटलमेंटमधील त्यांच्या सहमतीनुसार पैसे न भरल्यास त्यांना जबाबदार धरले जाईल आणि त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाई केली जाईल.

8. या प्रतिज्ञापत्राच्या आधारे उच्च न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायाधीशांनी त्याच दिवशी म्हणजे 03.07.2018 रोजी आदेश देऊन तुरुंगवासाची शिक्षा स्थगित करून अंतरिम संरक्षण दिले व त्यांना रु.25,000/- च्या वैयक्तिक मुचलक्यासह तेवढ्याच रकमेच्या एक किंवा अधिक हमीपत्रावर जामिनावर सोडण्याचे निर्देश दिले. ठरलेल्या रकमेच्या अदा करण्यासाठी यापुढे मुदतवाढ दिली जाऊ नये, असे निर्देश ही न्यायालयाने दिले असून अनुपालनाची माहिती देण्यासाठी 8 ऑक्टोबर 2018 ही तारीख निश्चित करण्यात आली होती.

9. प्रतिज्ञापत्रानुसार आदेश पारित झाल्याच्या तारखेस देण्यात आलेल्या 25 लाख रुपयांव्यतिरिक्त 2 कोटी रुपये 30 सप्टेंबर 2018 रोजी किंवा त्यापूर्वी द्यायचे होते. उर्वरित 1 कोटी 65 लाख रुपयांची रक्कम 15 मार्च 2019 रोजी किंवा त्यापूर्वी भरणे अपेक्षित होते. त्यानंतर 20 मार्च 2019 रोजी उच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली आणि तोपर्यंत त्यांनी केवळ 82 लाख रुपये भरले होते. उर्वरित रक्कम भरण्यासाठी 20 एप्रिल 2019 पर्यंत मुदत मागितली होती. थकबाकीची रक्कम रु.1,69,10,000/- असल्याचे तक्रारदाराच्या वकिलांनी निदर्शनास आणून दिले. उच्च न्यायालयाने दिनांक 20.03.2019 रोजी रु.1,69,10,000/- भरण्याची मुदत 20 एप्रिल 2019 पर्यंत वाढविली आणि पुढे अशी तरतूद केली की जर ही रक्कम भरली नाही तर जामीन मंजूर करण्याचा आणि शिक्षा स्थगित करण्याचा आदेश न्यायालयाकडे पुढील संदर्भ न देता तात्काळ रद्द केला जाईल.

10. त्यानंतर असे दिसून येते की विद्यमान अपीलकर्ते सतीश पी. भट्ट यांनी 16 एप्रिल 2019 रोजी प्रलंबित पुर्ननिरीक्षणात फौजदारी अर्ज दाखल केला ज्यात असे नमूद केले आहे की त्यांनी 3 जुलै 2018 च्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे रु.3,90,00,000/- पैकी 50% म्हणजे त्याचा वाटा रु. 1,95,00,000/- भरला आहे आणि म्हणून त्यांना आरोपातून मुक्त केले जाउन त्यांची निर्दोष मुक्तता केली जावी. या अर्जावर तक्रारदाराला 19 जून 2019 रोजी नोटीस बजावून 10 जुलै

2019 निश्चित करण्यात आली. त्या तारखेला प्रकरण 16 जुलै 2019 पर्यंत तहकूब करण्यात आले. त्यानंतर 16 जुलै रोजी सुनावणी 23 जुलै 2019 पर्यंत तहकूब करण्यात आली. 23 जुलै 2019 रोजी उच्च न्यायालयामधे दिलेले प्रतिज्ञापत्राचे पालन न केल्याबद्दल 3 जुलै 2018 च्या आदेशाद्वारे दिलेली शिक्षा व जामीन रद्द करण्याचा आदेश दिला आणि 20 मार्च 2019 च्या आदेशाच्या अनुषंगाने मुदतवाढ देताना असे निदर्शनास आले की डिफॉल्ट झाल्यास जामीन आदेश आणि शिक्षेचे निलंबन आदेश न्यायालयाच्या संदर्भाशिवाय आपोआप मागे घेतले जातील.

11. 3,90,00,000/- रुपयांपैकी त्याचा अर्धा वाटा रु.1,95,00,000/- इतका असेल जो योग्य रीतीने भरला गेला आहे आणि त्यामुळे त्याचा जामीन रद्द करण्याचा आणि शिक्षेला स्थगिती देण्याचा उच्च न्यायालयाचा आदेश योग्य नाही आणि तो रद्द करण्यात यावा, असा युक्तिवाद अपीलकर्त्याच्या वकिलांनी केला आहे.

12. दुसरीकडे, तक्रारदाराच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला आहे की आजमितीस रु.83,10,000/- ची थकबाकी आहे आणि म्हणूनच तक्रारदार 15 मार्च 2019 पासून अपीलकर्ता तसेच मध्यस्थ्याकडून खर्चासह प्रत्यक्ष देयक देईपर्यंत चक्रवाढ व्याज @ 12% वार्षिक सह रु.83,10,000/- मिळण्यास पात्र आहे.

13. मध्यस्थांनी आपले उत्तरही दाखल केले आहे आणि त्यांच्या मते अपीलकर्ता आणि मध्यस्थ यांच्यातील भागीदारी 60:40 च्या प्रमाणात होती आणि त्यांनी कंपनीतील त्यांच्या समभागांनुसार त्या प्रमाणात रु.4,63,50,000/- ची निश्चित रक्कम देण्यास सहमती दर्शविली होती. सत्र न्यायालयात अपील प्रलंबित असताना 03.07.2018 पूर्वी 73,50,000 रुपयांची रक्कम त्यांनीच भरली होती आणि त्यामुळे त्यांना या रकमेचे समायोजन करण्याचा अधिकार होता, असेही त्यांचे म्हणणे आहे. तसेच तक्रारदाराला द्यावयाच्या निश्चित रकमेपैकी म्हणजे

रु.4,63,50,000/- पैकी त्याचा वाटा 40% असून त्याने भरावयाची रक्कम रु.1,85,00,000/- असेल. त्याने यापूर्वी रु.73,50,000/- भरले असल्याने त्याला आणखी रु.1,11,90,000/- भरावे लागणार आहेत. त्याच्या म्हणण्यानुसार, त्याने दिनांक 03.07.2018 च्या आदेशानंतर रु. 1,11,90,000/- एवढी रक्कम भरली आहे. 83,10,000/- ची थकित रक्कम अपीलकर्त्याच्या वाट्याला येते ज्याचे एकूण दायित्व ठरलेल्या रकमेच्या 60% असल्यामुळे ती रक्कम रु.2,78,10,000/- येवढी होईल आणि त्याने फक्त रु.1,95,00,000/- भरल्यामुळे रु.83,10,000/- ची तूट आहे जी अपीलकर्त्याने भरावयाची आहे.

14. उर्वरित रक्कम अपीलकर्त्याने न भरल्याने मध्यस्थाला नाहक त्रास सहन करावा लागत आहे, असेही नमूद करण्यात आले आहे. 03.07.2018 रोजीच्या प्रतिज्ञापत्रापूर्वी त्यांच्यात झालेल्या ई-मेलनुसार ही रक्कम आपापल्या समभागांनुसार म्हणजेच 60:40 या प्रमाणात अदा केली जाईल, असे त्यांच्यात ठरविण्यात आले आणि सहमती झाली आणि ते संभाषण रेकॉर्डवर दाखल केले. ई-मेलची देवाणघेवाण आणि सेटलमेंटचा मसुदा वकिलांसोबत शेअर करण्यात आला आणि तो योग्यरित्या स्वीकारला गेला. मध्यस्थ वकिलाशी थेट व्यवहार करीत नव्हता आणि अपीलकर्ताच वकिलाशी व्यवहार करीत होता. अपीलकर्त्याने चुकीच्या पद्धतीने आणि फसवणुकीने "संबंधित समभागांनुसार" शब्द बदलून त्याऐवजी "समान" असा शब्द घातलेला आहे. मध्यस्थीला घाईघाईने प्रतिज्ञापत्र दाखल करण्याच्या तारखेस म्हणजे 03.07.2018 रोजी स्वाक्षरी करण्यास भाग पाडले गेले आणि त्याने अपीलकर्त्यावर आणि त्या दोघांची बाजू मांडणाऱ्या वकिलावर विश्वास ठेवला. या प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी मध्यस्थीने सुधारित अर्जाद्वारे उच्च न्यायालयात ही याचिका दाखल केली आहे, जो अर्ज अद्याप प्रलंबित आहे, असेही नमूद करण्यात आले आहे.

15. 03.07.2018 रोजीचे प्रतिज्ञापत्र तसेच 03.07.2018 रोजीचा आदेश आणि त्यानंतर उच्च न्यायालयाने दिलेले नंतरचे आदेश आम्ही पाहिले आहेत. यावरून असे स्पष्ट होते की, तक्रारदाराला एकूण रु.4,63,50,000/- इतकी रक्कम प्राप्त होणे क्रमप्राप्त होते. हमीपत्रात तसेच दिनांक 03.07.2018 च्या आदेशात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की दोघेही त्यांच्या सहमतीनुसार आणि त्यांच्यातील करारानुसार समान रक्कम देतील आणि त्यात पुढे अशी अट आहे की तडजोडीतील त्यांच्या सहमतीनुसार दोघांपैकी कोणीही पैसे न भरल्यास त्यांना जबाबदार धरले जाईल आणि कायद्यानुसार त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

16. दोन संचालक म्हणजेच अपीलकर्ता आणि मध्यस्थ यांच्यातील तडजोड  या दोघांमध्येच असून आणि तक्रारदार त्यास बांधील नाही. तक्रारदाराचा करार किंवा संमती केवळ रु.4,63,50,000/- स्वीकारण्याएवढीच होती. दोन्ही पक्षांनी स्वाक्षरी केलेल्या करारावर त्यांनी स्वाक्षरी केली नव्हती. मान्य आहे की, दोघेही अपीलकर्ता आणि मध्यस्थ एजीपीएल कंपनीचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष आहेत आणी म्हणूनच, त्यांना ट्रायल कोर्टाने दोषी ठरवले आणि अपीलीय न्यायालयाने त्यांच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब केले.

17. कोणाला किती रक्कम द्यायची या प्रश्नात जाण्याची आमची इच्छा नाही. वस्तुस्थिती अशी आहे की देण्यास मान्य केलेली एकूण रक्कम भरली गेली नाही आणि उच्च न्यायालयाच्या दिनांक 20.03.2019 च्या आदेशानुसार रिव्हीजन करणा-याने मान्य केलेली रक्कम भरण्यास टाळाटाळ केल्याने जामीन आणि शिक्षेच्या स्थगितीद्वारे दिलेले अंतरिम संरक्षण न्यायालयाचा संदर्भ न घेता मागे घेतले जाईल. आम्हाला संबंधित आदेशात कोणतीही कमतरता आढळत नाही.

18. अटकेला स्थगिती देण्याबाबत या न्यायालयाने दिनांक 26.08.2019 च्या आदेशाद्वारे संरक्षण दिले आहे, परिणामी अपीलकर्ता आणि मध्यस्थ यांनी अद्याप शिक्षा भोगलेली नाही. दुसरीकडे, तक्रारदाराला 03.07.2018 रोजीच्या आदेशाचेच नव्हे, तर 26.08.2011 च्या कनिष्ठ

न्यायालयाच्या आदेशाचेही फळ मिळालेले नाही. ट्रायल कोर्टाच्या आदेशानुसार मिळणाऱ्या रकमेपेक्षा खूपच कमी रक्कम घेण्याचे त्यांनी मान्य केले. 2007 पासून जवळपास 16 वर्षे ते न्यायालयीन वाद करत आहेत.

19. त्यानुसार उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशात कोणताही बेकायदेशीरपणा अाम्हाला आढळत नाही. त्यानुसार अपील फेटाळले जाते आणि आजपासून चार आठवड्यांच्या आत उत्तरदाता क्रमांक 2 (तक्रारदार) यांना 5 लाख रुपये दंड द्यावा. खर्चाची ही रक्कम उत्तरदाता क्रमांक 2 ला दिलेल्या नुकसान भरपाईच्या तुलनेत समायोजित केली जाणार नाही तर त्याव्यतिरिक्त असेल, असे स्पष्ट करण्यात येते.

20. अपीलकर्ता आणि मध्यस्थांनी शिक्षा भोगण्यासाठी आजपासून चार आठवड्यांच्या कालावधीत आत्मसमर्पण करावे, असे निर्देश देण्यात येतात. त्यांनी शरण न आल्यास उच्च न्यायालयाने शिक्षेची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य ती दंडात्मक पावले उचलावीत. उच्च न्यायालयासमोरील रिव्हीजन अद्याप प्रलंबित आहेत. उच्च न्यायालय रिव्हीजन तसेच प्रलंबित अर्ज असल्यास त्यावर निर्णय घेईल आणि प्रतिज्ञापत्राचे पूर्णपणे पालन केले गेले आहे की नाही याची खात्री करेल आणि तक्रारदारास झालेल्या पुढील त्रासाची योग्य भरपाई दिली जाईल याची खात्री करेल.

21. प्रलंबित अर्ज असल्यास ते निकाली काढले जातात.

तयार केलेल्या हेडनोट्स *:* अंकित ज्ञान                    खटल्याचा निकाल *:* अपील फेटाळले .

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.